**नेटवर्क**

एक दिवस संताच्या मागे एक कुत्रे लागले. पण संता जोराजोरात हसत होता. बंता त्याला म्हणतो : ''अरे तुझ्या मागे कुत्रे लागले आहे आणि तू हसत आहेत? तुझे डोके ठिकाणावर आहे का?''
**संता** : ''अरे गंमतच आहे ना ही..! माझ्याकडे एअरटेलचा फोन आहे आणि हे हचचे नेटवर्क माझ्या मागे लागले आहे.

# धनदांडगे उद्योजक करताहेत पाण्यावर कब्जा !

**देशभरातील जलसाठ्याच्या स्थितीवर** विचार करण्यासाठी देशाच्या विविध भागातून आलेल्या पत्रकारांचे एक राष्ट्रीय चर्चासत्र विशाखापट्टणम येथे नुकतेच झाले. त्यातील चर्चेचा हा गोषवारा.

**रजनीश जोशी**

rajanish.joshi@esakal.com






**आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम जिल्ह्यातील काक्रापल्ली येथे उभारल्या जात असलेल्या 'इस्ट कोस्ट पॉवर कंपनी'च्या प्रकल्पाला स्थानिक मच्छिमार व गावकरी विरोध करीत आहेत.**

विशाखापट्टणमच्या नितांतसुंदर समुद्रकिनारी देशातील जलसमस्येबाबतचे चर्चासत्र नुकतेच झाले. दिल्लीच्या सेंटर फॉर सायन्स अँड एनव्हॉयरमेंट (सीएसइ) या संस्थेने मला त्यासाठी आमंत्रित केले होते. देशाच्या कानाकोपऱ्यातून सुमारे ८० पत्रकार आणि विविध वाहिन्यांचे प्रतिनिधी त्यासाठी आले होते. पहिल्या दिवशी देशभरातील जलसाठ्यांबाबत चर्चा आणि दुसऱ्या दिवशी काक्रापल्ली येथील इस्ट कोस्ट पॉवर कंपनीच्या वादग्रस्त प्रकल्पस्थळाला भेट असा कार्यक्रम झाला.

सीएसइच्या संचालक सुनीता नारायण, उपसंचालक चंद्रभूषण यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन झाले. विविध प्रकल्पांसाठी जमीन उपलब्ध करून देण्याच्या निमित्ताने सध्या देशभरात वाद आणि आंदोलने सुरू आहेत. मात्र पुढील काळात ती पाण्यासाठी होतील, अशी भीती श्रीमती नारायण यांनी व्यक्त केली. पिण्याचे पाणी, सिंचन आणि उद्योगांना दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या प्राधान्यक्रमावरून वाद सुरू आहेच. महाराष्ट्रात सिंचनाआधी उद्योगांना पाणी दिले जावे, असे राज्याच्या जलनीतीमध्ये म्हटले आहे. त्याचा कित्ता देशातील अन्य राज्येही गिरवत आहेत. उद्योगासाठी पाणी दिल्यास त्याचे पैसे तत्काळ मिळतात. सिंचनासाठीची थकबाकी मोठी असते. ती वसूल करणे तापदायक असते. त्यामुळे सिंचनाला प्राधान्य क्रमात तिसरा क्रमांक दिल्याचे सांगितले जाते. पाणी विकासासाठी आवश्यक आहेच, पण त्याची उपलब्धता आणि वापराबद्दल व्यापक चर्चा केली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. गुजरातमधील निरमाच्या सिमेंट प्रकल्पासह आंध्रप्रदेशातील काक्रापल्ली वीज प्रकल्प आणि सोमपेटाच्या औष्णिक प्रकल्पाला तातडीने पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. या प्रकल्पांना स्थानिक जनतेचा असलेला विरोध दुर्लक्षित करण्यात आला आहे.

देशातील विविध राज्य सरकारांच्या वतीने पाण्याचे फेरवाटप अन्यायकारक होत असल्याची भावना प्रबळ होऊन येत्या काळात उद्योग विरुद्ध शहरांचा लढा सुरू होण्याची शक्यता आहे. छत्तीसगढमध्ये औद्योगिक विकास वेगाने होत आहे. महानदीच्या पाण्याची उपलब्धता तिथे समस्या निर्माण करीत आहे. या राज्यात नवे प्रकल्प प्रचंड संख्येने प्रस्तावित आहेत. कोरबा ५९, बिलासपूर ८३, रायगढ २९७, जंजीर-चंपा १११, कैपूर ३१९, दुर्ग २०१ अशी त्यांची यादी आहे. यात रासायनिक प्रकल्पांपासून इतर अनेक उद्योग आहेत. त्या सर्वांना पाणी पुरवण्यासाठी महानदीचा पर्याय आहे. या स्थितीत परिसरातील स्थानिक जनतेच्या तोंडचे पाणी हे प्रकल्प पळवल्याशिवाय राहणार नाहीत, हा धोक्याचा इशारा आहे.

नद्यांमधील पाणी वीजप्रकल्पांसाठी वापरण्यात येणार असल्याने आणखी मोठी समस्या निर्माण होईल. वीज वापर करणाऱ्या लोकांचा रहिवास खुंटणार असून उद्योग मात्र खुशाल वाढणार आहेत. नद्यांचे प्रवाह उद्योगांसाठी पाणी अडवल्याने कोरडे पडणार आहेत. मग विकास नेमका कशाचा?


भारतात सध्या कृषी क्षेत्रासाठी पाण्याचा वापर ८२ टक्के होतो. उद्योगांसाठी १० टक्के तर घरगुती वापरासाठी ८ टक्के पाणी वापरले जाते. विकसित देशांमध्ये घरगुती वापरासाठी ५१ टक्के, उद्योगांसाठी ३५ टक्के तर कृषीसाठी १४ टक्के पाणी वापरले जाते. हे प्रमाण पुरेसे बोलके आहे.

भारतात उद्योगांसाठी पाणी दिल्यानंतर काय होणार आहे? प्रदूषित पाणी आणि इंडस्ट्रिअल वेस्ट जनतेला मिळणार आहे. राजकीय व्यक्तींचे हितसंबंध जोपासले जाणार आहेत. पाणी वाटपावरचा ताण त्यामुळे वाढणार आहे. भारतातील सर्व राज्यांनी पाणी वाटपाचा प्राधान्यक्रम घरगुती व पिण्यासाठी प्रथम, शेतीसाठी दुसरा व उद्योगांसाठी तिसरा असाच ठेवायला हवा. यासंबंधी विशेष धोरण आखायला हवे. जलसुरक्षेसाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था किंवा धोरण कोणत्याही राज्यात नाही. जैवविविधता टिकवण्यासाठी पाण्याच्या वापराबद्दल कोठेही चर्चा नाही. जलप्रदूषणाबाबत कोणतेही गांभीर्य नाही. जलगर्भ भूमी 'वेस्ट लँड' म्हणून उद्योगांना देण्याचा प्रकार वाढत आहे. कागदोपत्री फसवणूक करून स्थानिक जनतेला नाडले जात आहे. कार्पोरेट व्यवस्था पाणी पळवून नेत आहे. ठिकठिकाणचे तलाव पुन्हा शोधले पाहिजेत, त्यात पाणी कायमस्वरूपी राहील, यासाठी व्यवस्था करण्याची गरज आहे.

देशपातळीवर पाण्यासंबंधीची प्रचंड अनास्था आहे. केंद्र सरकारच्या संबंधित खात्यात जलसाठ्याची नेमकी माहिती देणारी आकडेवारी उपलब्धच नाही. जी आकडेवारी दिली जाते ती समजायला कठीण असते. ती अगम्य भाषेत नमूद केली जाते. सर्व राज्यांत स्थानिक पातळीवर पाण्यासाठी संघर्ष सुरू आहे. हे संघर्ष थांबवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर कसलेही धोरण नाही. कोणताही विचार केला जात नाही.

हवामान बदलामुळे पाणीसाठ्यांवर, पावसावर होणाऱ्या विपरीत परिणामाची सरकारी पातळीवर सध्या तरी कसलीही दखल घेतली जात नाही. किंबहुना हवामान बदल हा पाण्यावर दूरगामी परिणाम करणारा घटक आहे, हे सरकारच्या खिजगणतीतही नाही. विकासाच्या नावाखाली पाण्याचे केले जाणारे वाटप प्रदूषणात भर टाकणारे आहे. त्यातून देशाच्या विविध भागात कायमस्वरूपी पाणीटंचाई निर्माण होणार आहे. प्रदूषणामुळे भूगर्भातील पाणी वापरताच येणार नाही, अशी स्थिती अनेक ठिकाणी आहे. देशपातळीवर पाण्याच्या उपलब्धतेचा आणि साठवणुकीचा विचार या चर्चासत्रात झाला.

## सोलापूर जिल्हा, उजनी धरण आणि जलप्रदूषण !



उद्योगांमुळे उजनीसारखे महाकाय धरण प्रदूषित होते आणि त्याची पूर्ण माहिती असूनही सरकारी पातळीवर, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पातळीवर कोणतीही दखल घेतली जात नाही. उजनी धरणाचे पाणलोट क्षेत्र आणि पुणे जिल्ह्यातील धरणांची संख्या व भौगोलिक रचना लक्षात घेता आगामी काळात हे धरण पूर्ण क्षमतेने भरू शकेल का अशी शंकाही व्यक्त करण्यास जागा आहे. पिंपरी चिंचवड भागातील अनेक उद्योग घातक रासायनिक द्रव भीमा नदीच्या पात्रात सोडतात. राजेंद्रसिंहांसारख्या जलतज्ज्ञाने हे पाणी मलमूत्रयुक्त आहे, असे सांगितले आहे. माढ्याचे अनिल पाटील आणि पुण्यातील जलबिरादरीचे कार्यकर्ते या धरणातील जलप्रदूषण कमी व्हावे, यासाठी प्रयत्न करीत आहेत. पण हा लढा एक-दोन वर्षांचा नाही. त्यासाठी १५-२० वर्षे सतत लढावे लागणार आहे. पुणे परिसरातील उद्योजक रोज लाखो लोकांच्या जिवाशी खेळ करीत आहेत. राज्य सरकार मात्र ठिम्म आहे. त्यासाठी लोकांनी आपल्या पातळीवर उठाव करण्याची गरज आहे. अनिल पाटलांनी पुकारलेला एल्गार हे त्याचे पहिले पाऊल ठरावे. देशपातळीवर जलसाठ्याबद्दल काटेकोर विचार सुरू असताना सोलापूर जिल्ह्यातील स्थिती भयावह आहे, जागे होण्याची हीच वेळ आहे.




**विशाखापट्टणम येथे झालेल्या चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना 'सीएसइ'च्या संचालक सुनीता नारायण. डावीकडे समन्वयक सुपर्णो बॅनर्जी, 'डाऊन टू अर्थ'चे संपादक रिचर्ड्स.**